महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.
(महाराष्ट्र शासन अंगीकृत)
CIN : U40109MH2005SGC153645
दुरध्वनी क्रमांक : ०२२ - २४०७७४४१
फॅक्स क्रमांक : ०२२ - २४०२५७६३

क्र. मासं/रवका/न.क्र.९/COVID-१९/ १६५००
एक्स्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत,
तळ मजला, प्लॉट नं.१, धारावी रोड,माटुंगा,
मुंबई ४०० ०१९
email : cgmp@mahadiscom.in
website : www.mahadiscom.in
दिनांक : ०८/१०/२०२०

# परिपत्रक

**विषय :** **बंद (Lock Down) कालावधीमध्ये दिव्यांग अधिकारी/ कर्मचारी यांच्या कार्यालयातील उपस्थितीबाबत स्पष्टीकरणात्मक सूचना**

**संदर्भ :** १) शासन निर्णय क्र. समय २०२०/प्र.क्र.३५/१८ (रवका) दि. ११.०६.२०२०.
२) परिपत्रक क्र. मासं/रवका/न.क्र.९/COVID-१९-११/११४७६ दि. १७.०६.२०२०.
३) शासन परिपत्रक क्र. दिव्यांग-२०२०/अंनै.सं०७/सा.प्र.वि./दि.क.२ दि. २५.०९.२०२०.

कोविड - १९ चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी शासनाकडून तसेच कंपनीकडून कार्यालयीन उपस्थिती मर्यादित ठेवण्याबाबत वेळोवेळी सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. संदर्भ क्र. १ मधील शासन निर्णयातील सूचनांच्या धर्तीवर कंपनीतील सर्व दिव्यांग अधिकारी / कर्मचारी यांना कार्यालयात उपस्थित राहण्यापासून सूट देण्यात आलेली आहे.

२. सद्यस्थितीत संदर्भ क्र. ३ मधील शासन परिपत्रकातील सूचनांच्या अनुषंगाने खालील मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात येत आहेत.

अ) कोरोनाचा वाढता प्रादुर्भाव लक्षात घेता कंपनीच्या कार्यालयामध्ये आळीपाळीने (रोटेशन) पध्दतीने दैनंदिन उपस्थिती काही टक्क्यांच्या मर्यादेपर्यंत ठेवण्याच्या सूचना निर्गमित केलेल्या आहेत अशा कार्यालयांमध्ये, तसेच ज्या कार्यालयांमध्ये १००% उपस्थिती ठेवण्यात आली आहे, अशा कार्यालयांमध्ये, सार्वजनिक वाहतुकीची सुविधा सुरळीत होईपर्यंत दिव्यांग अधिकारी / कर्मचारी यांना उपस्थित राहण्यापासून सुट देण्यात येत आहे.

ब) तथापि, अशी सुट दिल्यामुळे कार्यालयीन कामकाजावर विपरीत परिणाम होणार नाही, याची दक्षता संबंधित नियंत्रण अधिकारी यांनी घ्यावी.

३. सदरच्या सूचना पुढील आदेशांपर्यंत लागू राहतील. यापूर्वी कोवीड - १९ च्या व्यवस्थापनाबाबत वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेल्या मार्गदर्शक सूचनांचे काटेकारेपणे पालन करावे.

४. सदर परिपत्रक कंपनीच्या e-Library वर उपलब्ध करण्यात आलेले आहे.

**सोबत :** दि. २५.०९.२०२० रोजीचा शासन निर्णय.

(कमांडर शिवाजी इंदलकर)(से.नि.)
मुख्य महाव्यवस्थापक (मासं)

CS Scanned with CamScanner

करोना विषाणु प्रसारास प्रतिबंधात्मक उपाय म्हणून घोषित केलेल्या लॉकडाऊनच्या कालावधीत शासकीय कार्यालयातील दिव्यांग अधिकारी/कर्मचारी यांना उपस्थितीत सुट देणेबाबत..

**महाराष्ट्र शासन**

**सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,**

**शासन परिपत्रक क्रमांक: दिव्यांग-२०२०/अंनै.सं.०७/सा.प्र.वि./दि.क.२**

मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

दिनांक: - २५ सप्टेंबर, २०२०.

वाचा: १) शासन निर्णय, क्रमांक: सामान्य प्रशासन विभाग, दिनांक २१ एप्रिल, २०२०.

२) शासन निर्णय, क्रमांक: सामान्य प्रशासन विभाग, दिनांक ११ जुन, २०२०

**प्रस्तावना:-**

सद्यस्थितीत संपुर्ण महाराष्ट्रात कोरोनाचा वाढता प्रादुर्भाव लक्षात घेता शासकीय कार्यालयांमध्ये रोटेशन पध्दतीने दैनंदिन उपस्थिती काही टक्क्यांच्या मर्यादेपर्यत ठेवण्याच्या सूचना सामान्य प्रशासन विभागाने या अगोदरच निर्गमित केलेल्या आहेत. तथापि ज्या कार्यालयामध्ये १०० टक्के उपस्थिती ठेवण्यात आली आहे. त्या कार्यालयांमध्ये सार्वजनिक वाहतुकीची सुविधा सुरळीत होईपर्यत दिव्यांग अधिकारी/कर्मचारी यांना शासकीय कार्यालयात उपस्थित राहण्यापासुन सुट मिळण्याबाबत बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन परिपत्रक:-**

सद्यस्थितीत संपुर्ण महाराष्ट्रात कोरोनाचा वाढता प्रादुर्भाव लक्षात घेता शासकीय कार्यालयामध्ये रोटेशन पध्दतीने दैनंदिन उपस्थिती काही टक्क्यांच्या मर्यादेपर्यत ठेवण्याच्या सूचना सामान्य प्रशासन विभागाने या अगोदरच निर्गमित केलेल्या आहेत. तथापि ज्या कार्यालयामध्ये १०० टक्के उपस्थिती अनिवार्य ठेवण्यात आली आहे, अशा कार्यालयामध्ये सार्वजनिक वाहतुकीची सुविधा सुरळीत होईपर्यत दिव्यांग अधिकारी/कर्मचारी यांना उपस्थित राहण्यापासुन सुट देण्यात येत आहे. तथापि या सुटीमुळे कार्यालयीन कामकाजावर विपरीत परिणाम होणार नाही, याची दक्षता संबंधीत विभाग/आस्थापना घेतील.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतीक क्रमांक २०२००९२८१३२०३०६४२२ असा आहे. हा आदेश डिजिटल स्वाक्षरीने सांक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने

SANJAY GIRIDHAR PATIL

Digitally signed by SANJAY GIRIDHAR PATIL
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=0f7d1eee7567d430eefd928eefa78ed2a6072c4ce8f3c0aa4efaf26d9c32daeb, postalCode=400032, street=MANTRALAYA,MUMBAI, serialNumber=bd10fe5a55495bc381e7b4d4b658250c74eb3f55113a21fd21c8620f04c2c257, ou=SOCIAL JUSTICE DEPT, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=SANJAY GIRIDHAR PATIL
Date: 2020.09.28 13:24:39 +05'30'

**(सं.गि.पाटील)**

**उपसचिव, महाराष्ट्र शासन.**

**प्रति,**

१. मा. राज्यपाल यांचे खाजगी सचिव, राजभवन, मुंबई

२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा. उपमुख्यमंत्री, यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. मा.मंत्री (सा.न्या) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय,मुंबई
५. मा.राज्यमंत्री (सा.न्या) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय,मुंबई
६. मा. मुख्य सचिव यांचे यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
७. अप्पर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग,मंत्रालय,मुंबई
८. आयुक्त, दिव्यांग कल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य,पुणे.
९. निवड नस्ती, दिव्यांग कल्याण-२.